ePaper
‖ वर्ष - 8 । अंक -187 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com ‖ गुरुवार, दिनांक 16 जानेवारी 2025 ‖ पुणे आवृत्ती ‖ mahaenews.com ‖ maha_enews ‖ Mahaenews

## अभिनेता सैफ अली खानवर चाकू हल्ला, वांद्रेतील घरात मध्यरात्री घडली घटना



### आतील पानांत


- प्रतिका रावलचा वर्ल्ड रेकॉर्ड!
- सारा खानने केला रॅम्प वॉक
- इथियोपियाने घेतला मोठा निर्णय!
- कराडला 7 दिवसांची कोठडी!



## वाल्किम कराडला महानगरपालिकेने बजावली नोटीस

# कराडचं पिंपरी-चिंचवड कनेक्शन!

### वाकडमधील पार्क आयवरी येथे कोट्यवधींचा फ्लॅट असल्याचं उघड

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज**

**बीड मधील खंडणी प्रकरणातील आरोपी असलेल्या वाल्मिक कराडचं पिंपरी-चिंचवड कनेक्शन असल्याचं उघड झालं आहे. वाकडमधील पार्क स्टेट येथे कोट्यावधीचा फ्लॅट असल्याचं उघड झालं आहे. वाल्मिक कराड आणि त्याच्या पत्नीच्या नावावर सहाव्या मजल्यावर ६०१ फ्लॅट नंबरचा हा फ्लॅट आहे. सुमारे एक लाख रुपयांचा मालमत्ता कर थकवल्याप्रकरणी वाल्मिक कराडच्या फ्लॅटच्या दरवाज्यावर कर संकलन विभागाकडून नोटीस लावण्यात आली आहे. कराडने थकबाकी न भरल्यास महानगरपालिका पुढे नेमकी काय कारवाई करत हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.**




दरम्यान मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कटाच्या सहभागात संशयित म्हणून वाल्मिककराडवर मंगळवारी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कलमान्वये (मकोका) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर परळीत मात्र आंदोलन सुरू झाले असून कराड समर्थकांनी परळी बंदची हाक दिली. बीड शहर पोलीस ठाण्याबाहेर वाल्मिक कराड समर्थकांनी ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. वाल्मिक कराडची ७५ वर्षांची आई आणि पत्नीही या ठिय्या आंदोलनात सहभागी झाल्या आहेत.

### काही सिमकार्ड अमेरिकेत रजिस्टर

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी आता तपासाला आणखी वेग आला आहे. दररोज या प्रकरणात नवनवीन माहिती समोर येत आहे. या प्रकरणात मकोका लावण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला बुधवारी बीड न्यायालयात हजर करण्यात आले. तिथे एसआयटीने त्याच्या १० दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. पण, न्यायालयाने कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आता २२ जानेवारीपर्यंत कराड पोलीस कोठडीत असेल. यावेळी एसआयटीकडून न्यायालयात अनेक मुद्दे मांडण्यात आले.

### वाल्मिक कराडचा पिंपरीत आणखी एक फ्लॅट

वाल्मिक कराडचा आलिशान फ्लॅट सील करण्याची प्रक्रिया पिंपरी चिंचवड पालिकडेकडून सुरु आहे. असं असतानाचं वाल्मिक कराडचा आणखी एक फ्लॅट असल्याचं समोर आलंय. हा फ्लॅट पत्नी मंजली वाल्मिक कराड यांच्या नावावर आहे.

पिंक सिटी रोडवरील मि कासा बेला सोसायटीतील ४०३ नंबरचा हा फ्लॅट आहे. फ्लॅटवर वाल्मिक कराडचे नाव आहे.

१ एप्रिल २०१६ पासून हा फ्लॅट मंजली यांच्या नावे असल्याची नोंद पिंपरी पालिकेच्या करसंकलन विभागाकडे आहे. आजच्या बाजारभावानुसार हा फ्लॅट एक कोटींचा आहे.

## जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेचे सील तोडले!

### गुन्हा दाखल : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन विभागाची चिखली परिसरात कारवाई

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरल्याने जप्त करण्यात आलेली सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँड कॉलेज, पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली या मालमत्तेचे सील तोडून आतमध्ये प्रवेश केल्याप्रकरणी महापालिकेच्या कर संकलन विभागांनी गुन्हा दाखल केला आहे.**



> पिंपरी-चिंचवड कर संकलन विभागाने थकबाकी असणारा मालमत्ता कर आकारणीसाठी मोहीम हाती घेतली आहे. ज्या मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे, व त्यांना वारंवार नोटीस देऊनही ते थकबाकी भरत नसतील, तर अशा मालमत्ता जप्त करून सील करण्यात येत आहे. जप्त केलेल्या मालमत्तांचे सील तोडल्यास संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
>
> -अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त,करसंकलन विभाग.

सुरेश विठ्ठल जाधव (रा.चिखली, पिंपरी-चिंचवड, पुणे) यांच्यावर मागील आठवड्यात (७ जानेवारी २०२५) चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी करसंकलन विभागाच्या चिखली विभागीय कार्यालयातील सहाय्यक मंडलाधिकारी बाळु रामचंद्र लोंढे यांनी फिर्याद दिली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ता कर वसुलीसाठी विविध मोहीम राबवल्या जातात. मालमत्ताधारकांना कर भरण्याचे वारंवार आवाहन करण्यात येते. त्यानंतरही मालमत्ता कर न भरल्यास मालमत्ता जप्त करून ती सील करण्यात येते. पण जप्त केलेल्या मालमत्तेच सील कर न भरता अनाधिकृतपणे तोडून मालमत्तेत प्रवेश केल्याचा प्रकार चिखलीत घडला आहे. चिखली कर संकलन विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत गट क्र. ७९४ पवारवस्ती, कुदळवाडी येथे सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँड कॉलेज आहे. ही मालमत्ता मालमत्ताधारक सुरेश विठ्ठल जाधव यांची आहे. या मालमत्तेची कर थकबाकी बिलाची रक्कम व चालू वर्षाची मालमत्ता कराची रक्कम आणि लागलेल्या दंडाची रक्कम अशी एकूण २४ लाख ५९ हजार ८३८ रुपये तर, अवैध बांधकाम शास्ती कर रुपये ३० लाख ८९ हजार २२६ रुपये अशी एकूण रक्कम ५५ लाख ४९ हजार ०६४ रुपये येणे बाकी आहे. त्यापैकी अवैध बांधकाम शास्ती कर वगळून २४ लाख ५९ हजार ८३८ रुपये एवढा मालमत्ता कर भरल्यास अवैध बांधकाम शास्ती कर रुपये ३० लाख ८९ हजार २२६ रुपये माफ होणार आहे. मालमत्ता कर थकबाकी भरण्याबाबत वारंवार मालमत्ताधारक सुरेश विठ्ठल जाधव यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी त्यास टाळाटाळ केल्याने अखेर ३१ डिसेंबर २०२४ रोजी चिखली कर संकलन कार्यालयाने सदर मालमत्ता जप्त करून सील केली होती.

# खासगी रुग्णालयांकडून नियमभंग!

## पुणे महापालिकेची कारवाईचे, सात रुग्णांलयांना नोटिसा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खासगी रुग्णालयांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या वारंवार तक्रारी येत आहेत. त्यामुळे राज्य पातळीवर खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने आठवडाभरात सुमारे १३५ खासगी रुग्णालयांची तपासणी केली आहे. यात ७ रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याचे समोर आले असून, त्यांना नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत.**



महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी केली जात आहे. त्यात खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणि किमान एक रुग्णशय्या असलेल्या रुग्णालयांचा समावेश आहे. याचबरोबर ॲलोपथी, आयुष, युनानी, नॅचरोपथी यासह सर्व शाखांच्या रुग्णालयांची तपासणी केली जात आहे. रुग्ण २४ तास दाखल करून घेतला जात नाही, अशा डे केअर सेंटरचा यात समावेश नाही. महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात क्षेत्रीय आरोग्य अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारी अशा तीन जणांच्या पथकावर तपासणीची जबाबदारी सोपविली आहे. शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांत अशी १५ पथके रुग्णालयांची तपासणी करीत आहेत.

आरोग्य विभागाने आठवडाभरात सुमारे १३५ रुग्णालयांची तपासणी केली. त्यात ७ रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याची बाब निदर्शनास आली. या रुग्णालयांना आरोग्य विभागाने कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणी झाली आहे का, याची तपासणी केली जात आहे. रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी करण्यात येत आहे. रुग्णालयाकडील अग्निशामक दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि जैववैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीबद्दल माहिती घेतली जात आहे, अशी माहिती सहायक आरोग्य अधिकारी सूर्यकांत देवकर यांनी दिली.

> खासगी रुग्णालयांची तपासणीची आवश्यकता नाही. कारण सहा महिन्यांपूर्वी शहरातील निम्म्या रुग्णालयांनी नियमांची पूर्तता करून परवाना नूतनीकरण केले होते. आता उरलेली निम्मी रुग्णालये परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया सुरू करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडूनही नियमांची पूर्तता आधीच करण्यात आली आहे.
>
> **- डॉ. संजय पाटील,** राष्ट्रीय सचिव, हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया

> महापालिकेककडून खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम सुरू असून, उपचारांचे दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, रुग्ण हक्क संहिता नसणे यासह इतर नियमांचे पालन होत नसल्याचे काही ठिकाणी निदर्शनास आले. या प्रकरणी ७ रुग्णालयांना नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत.
>
> **-डॉ. सूर्यकांत देवकर, सहायक आरोग्य अधिकारी, महापालिका**

---

# खेळाडूंनी खेळातील लवचिकता आजही जपलीय!

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनी भव्य मल्लखांब स्पर्धा

।पिंपरी-चिंचवड : ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंदजी यांच्या जयंती निमित्त दिघी गावचे युवा नेतृत्व तथा 'नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनचे' अध्यक्ष श्री. उदय दत्तात्रय गायकवाड यांच्या नेतृत्वात पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठी 'भव्य उदय चषक-2025' (जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धा) दिघी येथे पार पडली. 'नवजीवन स्पोर्ट्स फाऊंडेशन' आणि 'पुणे जिल्हा मल्लखांब संघटनेच्या' संयुक्त विद्यमाने या भव्य मल्लखांब स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या काळात नवीन पिढीला आपले पारंपरिक खेळ जपता आले पहिजेत या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. बारामती पासून ते आंबेगाव, जुन्नर येथील मल्लखांबपट्टूंनी सहभाग घेतला.**



या स्पर्धेत मुले – मुली वयोगट (10 वर्षे / 12 वर्षे / 14वर्षे / 16 वर्षे ) अशा विविध गटांतील मल्लखांबपटूंनी आपले कौशल्य प्रदर्शित केले. मल्लखांबाच्या विविध प्रकारांमध्ये स्पर्धकांनी आपले दमदार खेळ दाखवत प्रेक्षकांचे मन जिंकले. या स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक श्री. दत्तात्रय (आबा) गायकवाड व युवा नेतृत्व तथा नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष उदय दत्तात्रय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना दत्तात्रय (आबा) गायकवाड यांनी मल्लखांब हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा खेळ असून तो आजच्या पिढीला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत बनवतो, असे सांगितले.

पुस्तक आणि मोबाईल पासून लांब राहून नव्या पिढीने कसरतीवर भर देणे गरजेचे आहे असे यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना कार्याध्यक्ष उत्तम लटपटे, वर्धा जिल्हा मल्लखांब संघटना सचिव संजय सुकळकर, महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना सदस्य संजय केकाण, पुणे जिल्हा मल्लखांब संघटना सचिव सचिन परदेशी, छत्रपती मल्लखांब पुरस्कार विजेते रवींद्र पेठे, पुणे जिल्हा मलखांब संघटना कार्यकारणी सदस्य श्रीपाद जगताप, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक व महाराष्ट्र मंडळ पंच अभिजीत भोसले , मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटना सचिव आशिष देवल आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी या स्पर्धेचे महत्त्व विशद केले. या स्पर्धेचे आयोजन करण्यामागे मल्लखांब खेळाचा प्रचार आणि प्रसार करणे, तरुण पिढीला या खेळाकडे आकर्षित करणे आणि मल्लखांबपटूंना एकत्र आणून त्यांच्यातील प्रतिभा निखारणे, हे उद्देश्य होते. अभ्यासू आणि निपक्षपातिपणे सर्व पंचांनी निकाल मार्गी काढत विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले.

> "फक्त दप्तर, अभ्यास आणि मोबाईल यात नवीन पिढी न गुरफटून जाता आपल्या पारंपरिक खेळांवर देखील त्यांनी भर दिला पाहिजे. त्यांच्या शरीराची कसरत जपली पाहिजे. पारंपरिक मल्लखांब खेळाचा प्रसार व्हावा या उद्देशाने आम्ही समाजासमोर व नवीन युवा पिढीसमोर हा एक नवीन आदर्श ठेवण्याचा छोटासा संकल्प केला. असे शारीरिक कसरतीचे खेळ/स्पर्धा आम्ही नेहमी राबवत असतो. भविष्यात देखील आम्ही यांना चालना देणार आहोत."
>
> **–उदय गायकवाड,** अध्यक्ष : नवजीवन स्पोर्ट्स फाऊंडेशन, दिघी.

## महापालिकेकडून 72 हजार व्यापाऱ्यांना नोटिसा

# उद्योजकांमागे 'एलबीटी'चे शुक्लकाष्ट!

### 31 मार्चअखेर कार्यवाही पूर्ण करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्थानिक संस्था कर (एलबीटी) लागू असताना नोंदणीकृत व्यापारी, उद्योजक यांनी एलबीटी योग्य प्रकारे भरला आहे की नाही, हे तपासण्यासाठी महापालिकेने गेल्या चार वर्षांत ७२ हजार उद्योजक, व्यापाऱ्यांना नोटिसा बजावल्या आहेत. एलबीटी बंद होऊनही व्यापाऱ्यांच्या मागील नोटिशींचे शुक्लकाष्ट सुरूच आहे.**






एलबीटीची आकारणी ३० जून २०१५ पासून बंद झाली. मात्र, सन २०१३ मध्ये नोंदणी केलेल्या ज्या उद्योजक, व्यापाऱ्यांनी एलबीटीची रक्कम भरली आहे. त्यांच्या कागदपत्रांची तपासणी केली जात ~~आहे. त्यांनी भरलेली रक्कम योग्य~~ आहे की नाही, हे तपासण्यात येत आहे. त्यासाठी सन २०२० पासून व्यापारी, उद्योजकांना नोटिसा दिल्या जात आहेत. मालाची नोंदवही, व्यापार लेखाची प्रत, नफा व तोट्याचा हिशेब, ताळेबंद, आयकर लेखापरीक्षण अहवाल, विक्रीकर विवरण पत्र, खरेदी व विक्रीकर वितरणामध्ये दाखवलेले खरेदीचे ताळमेळ पत्र, एलबीटी नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेल्या मालाचा तपशील, शहराबाहेर निर्यात आणि आयात केलेल्या मालाचा तपशील, एलबीटी भरलेल्या सर्व चलनाच्या व विवरणाच्या प्रतीची मागणी केली जात आहे.

एलबीटी विभागाकडे नोंदणी केलेले उद्योजक, छोटे-मोठे दुकानदार अशा ७२ हजार जणांना नोटिसा दिल्या आहेत. पाच हजार रुपयांपासून कोट्यवधी रुपयांपर्यंतच्या रकमेसाठी या नोटिसा बजावल्या आहेत. नोटिसांपैकी कागदपत्रे सादर करणाऱ्या ४० हजार प्रकरणांची तपासणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ३१ मार्चअखेर कार्यवाही पूर्ण करण्याचे विभागाचे नियोजन करण्यात आले आहे.

#### अभय योजना प्रलंबित

एलबीटी धारकांसाठी प्रस्तावित असणारी अभय योजना शासनस्तरावर मंजुरीसाठी प्रलंबित आहे. ही योजना मंजूर झाल्यास त्या अंतर्गत उद्योजक, व्यापाऱ्यांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर कमी पैसे भरणाऱ्या उद्योजक, व्यापाऱ्यांना लागू केलेले व्याज आणि दंड माफ होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

एलबीटी विभागाद्वारे 'असेसमें'टच्या नावाखाली व्यापारी, उद्योजकांना त्रास देण्यात येत आहे. उद्योजकांनी महापालिकेने मागितलेली सर्व कागदपत्रे दिली असतानाही पुन्हा विविध कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या नोटिसा दिल्या जात आहेत. एलबीटी बंद झाल्यानंतर उद्योजकांकडून सर्व रक्कमेची वसुली केली आहे. त्यानंतरही नोटिसा काढून उद्योजकांत भीतीचे वातावरण तयार केले जात असल्याचा आरोप पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी केला.

उद्योजक, व्यापाऱ्यांनी एलबीटीची भरलेली रक्कम योग्य आहे की नाही, हे तपासण्यात येत आहे. त्यासाठी नोटिशींद्वारे कागदपत्रांची मागणी केली जात आहे. कागदपत्रे तपासण्याची मोहीम ३१ मार्चअखेर पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे एलबीटी विभागाचे उपायुक्त सीताराम बहुरे यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांकडे तक्रार**

महापालिकेने औद्योगिक परिसरातील उद्योजकांना एलबीटीची बाकी नसलेली रक्कम व्याज व शास्ती दंडासह भरण्याच्या नोटिसा पाठविल्या आहेत. वाढलेल्या कच्च्या मालाच्या किंमती, वाढलेला वीजदर, कामगारांचा तुटवडा, कामाची देयके वेळेवर न मिळणे अशा विविध कारणांनी उद्योजक हैराण झाले आहेत. त्यातच महापालिकेने पाठविलेल्या नोटिशींमुळे अगोदरच मेटाकुटीला आलेला उद्योजक आता पूर्णपणे नेस्तानाबूत होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगत याप्रकरणात लक्ष घालण्याची विनंती लघुउद्योग संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

---

## पुनावळे येथील साईराज हाइट्समध्ये सौरऊर्जा प्रकल्प!

### 55 KW क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प : 115 फ्लॅट धारकांना वीज बिलांमध्ये दिलासा मिळणार!

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुनावळे येथील साईराज हाइट्स सोसायटीने पुनावळे येथे 55 KW क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला. या महत्वाकांक्षी उपक्रमामुळे ११५ फ्लॅट्ससाठी अत्याधुनिक पद्धतीने सौर पॅनेल्सच्या माध्यमातून वीसपुरवठा केला जाणार आहे. हा सुसज्ज प्रकल्प परिसरासाठीआदर्श ठरत आहे.**




> "जगभरात नूतनीकरणीय ऊर्जा वापरण्याचा प्रवास वाढत असताना, सौर ऊर्जा ही सिद्ध झाली आहे. हा प्रकल्प केवळ दीर्घकालीन वीज बिलांमध्ये बचत करण्यास मदत करत नाही, तर स्वच्छ आणि टिकाऊ भविष्याच्या दिशेने आमच्या प्रतिबद्धतेला देखील बळकट करतो. या प्रकल्पाच्या यशामागे एकत्रित प्रयत्न आहेत.
> –भूपेश आतकरी, अध्यक्ष, साईराज हाइट्स सोसायटी.

पुनावळे येथील साईराज हाईटस येथील सौर ऊर्जा प्रकल्पाचे मा. आमदार अश्विनी जगताप यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी भाजपा उपाध्यक्ष नवनाथ ढवळे प्रमुख उपस्थिती होते. वीज दरवाढ आणि पर्यावरणीय चिंता यावर एक विश्वासार्ह आणि कार्यक्षम उपाय म्हणजे सौर ऊर्जा प्रकल्प. सध्या सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी अनेक सोसायटींकडून सकारात्मक प्रतिसाद येत आहे. अध्यक्ष भूपेश आतकरी आणि सचिव नितिन कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील अथक प्रयत्नांमुळे आणि सर्व सदस्यांच्या योगदानामुळे कॅपेक्स मॉडेलच्या आधारावर सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प सोसायटीने कार्यान्वित केला आहे. याबाबत सोसायटीचे अध्यक्ष आतकरी म्हणाले, या सौरऊर्जा प्रणालीद्वारे दरमहा ६५०० KW ऊर्जा उत्पादन होईल. यामुळे आमच्या वीजेच्या खर्चात दरमहा सुमारे दीड लाखांची बचत होईल, ज्यामुळे आमच्या एकूण वीज खर्चाचा ८०% हिस्सा कमी होईल.

यासोबतच, या उपक्रमामुळे दरमहा सुमारे १५० झाडांची कत्तल थांबणार आहे.ज्यामुळे आपला कार्बन फूटप्रिंट कमी होईल.हा प्रकल्प कार्यान्वित करताना उद्घाटनाच्या प्रसंगी माजी आमदार आश्विनी जगताप, तसेच नवनाथ ढवळे, विंडसन सोलारचे अध्यक्ष जयेश अकोले, सोसायटीचे कोषाध्यक्ष कुंदन बिजोरे, समीर तामणे, माधुर चिचानी, सरिता सोनावणे, प्रतीन, अंबुज गुप्ता, आणि निखिल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नामात असणे म्हणजेच शुद्धीवर असणे!

दारुड्यांच्या मेळाव्यात सारेच दारूच्या धुंदीत असतात. पण त्यांतल्या एखादा दारू न प्यालेला असला तर बाकीचे दारुडे त्याला ' हा शुद्धीवर नाही ' असे म्हणत असतात. वास्तविक तोच एकटा शुद्धीवर असून बाकीचेच खरे गैरसावध असतात. त्याप्रमाणे, आपण सर्वजण विषयांत दंग असल्याकारणाने, जो नामात असतो त्याला आपण ' हा शुद्धीवर नाही ' असे म्हणत असतो. वास्तविक पाहता, ' नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही ' अशी ज्याची दृढ भावना असते तोच खरा शुद्धीवर असतो, आपण मात्र भ्रमात असतो. आपल्याला झालेला हा भ्रम नाहीसा करायला तीन उपाय आहेत. एक सद्विचार, दुसरा सत्संगती, आणि तिसरा नामस्मरण. भगवंताचा विचार हाच खरा सद्विचार. एखाद्या माणसाला म्हटले, की तुझे अवयव आणि रंग यांच्याशिवाय ये, तर त्याला येता येणार नाही, कारण तो जिथे आहे तिथे त्याचा रंग आणि अवयव असणारच; त्याचप्रमाणे नाम, संत आणि भगवंत हे एकमेकांना चिकटूनच आहेत, त्यामुळे जिथे नाम आहे तिथे सत्संगती आणि भगवंत असतातच. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतोच. आजकाल इतकी यंत्रे निघाली आहेत, मग भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांनी एखादे यंत्र शोधून काढले नाही का, असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले आहे. त्या यंत्राचे नाव आहे ' रामनाम. ' हे यंत्र सर्वांना मिळू शकते, सर्वांना वापरता येते, शिवाय ते कधीच गंजत नाही.भक्त, भगवंत आणि नाम हे तिन्ही एकरूपच आहेत. जिथे नाम आहे तिथे भक्त आहे, आणि तिथेच भगवंत आहे. म्हणून नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. नाल्यातून, गटारातून पाणी वाहते, ते किती घाण असते ! पण ते नदीला मिळते आणि ती सागराला मिळते. सागर त्या सर्वांना सागररूप करून टाकतो. तसे मनुष्य कितीही पापी, दोषी, अपराधी असू द्या, त्याने नाम-नदीची कास धरली की तो रामसागररूप झालाच म्हणून समजा. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते म्हणून नामाने पाप नाहीसे होईल. अनाथ शब्द नाथावाचून नाही, आणि नाथाला अनाथावाचून नाथत्व नाही. राम सर्वांचा नाथ आहे. त्याच्या अखंड स्मरणात आपण राहू या. प्रपंच वनवासासारखा आहे. रामाच्या स्मरणात प्रपंचातली संकटे आणि दु:खे कस्पटाप्रमाणे वाटतील. बोधवचन:- तुम्ही नाम घेत गेलात तर तुम्हांला संत धुंदीत जाण्याची जरूरीच नाही. तेच तुम्हांला धुंदीत येतील.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# कुठं ती तडीपारी, अन् कुठं ही वाटमारी!

**भारतीय जनता पार्टीच्या अधिवेशनाच्या निमित्तानं केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांनी मुंबईमध्ये तुफान भाषण केलं आणि शरद पवार तसंच उद्धव ठाकरेंना तुफान चोपलं ! जनतेनं दिलेला कौल धुडकावून या दोघांनी वेगळं समीकरण मांडलं, आणि सत्ता बळकावली, त्यामुळं जनतेनं त्यांना दहा फूट खड्डयात गाडलं आणि महायुतीकडं प्रचंड बहुमतानं सत्ता दिली, हे अमितभाईंनी ठणकावून सांगितलं.**



शरद पवारांचा फुसका बार अमित शाहांच्या आरोपांना उत्तर देताना मात्र शरद पवार फसले. तडीपारी झालेल्यानं आम्हाला शिकवू नये, असा त्यांनी डायलॉग हाणून टाळ्या मिळवल्या, कार्यकर्त्यांना खुश केलं, पण त्यातच ते फसले ! भाजपानं नेमका हाच 'तडीपारी' शब्द उचलला आणि शरद पवारांवर जोरदार टीकास्त्रे सोडली! तडीपार, तडीपार असा जप करण्यात साजूक तुपातले 'पाळीव' पुरोगामी आघाडीवर आहेत, हे भाजपा विरोधकांच्या लक्षात आलं. तडीपारीसाठी नेमका गुन्हा काय ? पाकिस्तानच्या सोहराबुद्दीन नावाच्या स्मगलरचा आणि इस्लामी दहशतवाद्याचा गुजरात पोलिसांनी 'एन्काउंटर' केला होता. कथाकथित पुरोगाम्यांना इस्लाम प्रेमाचा पान्हा फुटला आणि त्यांनी केस केली. या प्रकरणाच्या वेळी अमितभाई शाह गृह राज्यमंत्री होते. केंद्रात काँग्रेसचे सरकार होतं. पोलीस खात्यानं त्यांनाही आरोपी केलं. इस्लामी दहशतवाद्याच्या एन्काउंटर साठी एका गृहमंत्र्याला टार्गेट करण्याचं हे कदाचित पहिलंच उदाहरण असेल.

कालांतरानं न्यायालयीन कामकाज सुरु झालं. या खटल्याशी संबंधित उच्चपदस्थ लोक असतील तर त्यांचा प्रभाव या खटल्यावर पडू नये, याची तजवीज न्यायालय नेहमीच करतं. त्यासाठी शाहांना कोर्टाच्या आदेशानं न्यायालयीन क्षेत्राबाहेर जावं लागलं. म्हणजेच गुजरातबाहेर जावं लागलं. लक्षात आलं का.. न्यायालयाच्या नेहमीच्या कामकाजाचा हा एक भाग आहे, आणि तीच आहे शाहांची तडीपारी!

अमितभाई शाह कोणत्या चोरी किंवा पाकिटमारीच्या गुन्ह्यामध्ये तडीपार नाहीत. लांडीलबाडी,वर्गणी खण्डणी हा तर पुरोगाम्यांचा पिढीजात धंदा आहे, त्या चष्म्यातून तडीपारी त्यांनी पाहिली असावी.

थोडक्यात सांगायचं तर एका इस्लामी दहशतवाद्यासाठी पुरोगाम्यांच्या लाडक्या काँग्रेसनं सीबीआय चा गैरवापर केला आणि राजकीय कारणासाठी अमित शाहांचे नाव गोवलं गेलं. सर्वांना माहीत आहेच, की पुढं ते या खटल्यातून निर्दोष मुक्त झाले.

या खटल्यामध्ये 'सीबीआय' चा काँग्रेसनं गैरवापर केला, असे ताशेरे न्यायालयाने ओढले आहेत, ते जगजाहीर आहे.काँग्रेस शासनानं इस्लामची आणि दहशतवाद्यांची नोकरी करायला देशाची सीबीआय वापरली होती, आणि हे सत्य आहे.

### खोटं बोला, पण रेटून बोला..

खोटं बोला पण रेटून बोला, ही शरदनीती हल्ली हल्ली अंगवळणी पडली आहे. इस्लामचं तुष्टीकरण करण्यासाठीच १३ वा काल्पनिक बॉम्बस्फोट याच महाशयांनी केला होता, आठवलं का ?

अमितभाई शाहांवर जे काही आरोप होते, ते इस्लामी नोकरीचे नव्हते, तेराव्या बॉम्बस्फोटाचे नव्हते..एका इस्लामी दहशतवाद्याला यमसदनी पाठवण्याचे होते, ही झाली वस्तुस्थिती !

### दहशतवादी विमानातून आणले !

शरद पवार हे संरक्षण मंत्री असताना त्यांनी जे. जे. हत्याकांडातील आरोपींना संरक्षण खात्याच्या विमानातून आणले होते, हा मुद्दा विधानसभेत खूपच गाजला होता. तत्कालीन, विरोधी पक्ष नेते गोपीनाथ मुंडे यांनी काँग्रेसची आणि शरद पवार यांची भ्रष्टाचाराची लक्तर अक्षरशः वेशीवर टांगली होती ! संरक्षण खात्याच्या त्या विमानातून कोणी कोणी प्रवास केला, याचे भरभक्कम पुरावेही सादर केले होते.
आता प्रश्न असा आहे की एखाद्या दहशतवाद्याचा खात्मा केल्याच्या आरोपावरून तडीपारी होणे हे भूषणावह का इस्लामचं तुष्टिकरण करता करता सत्तेच्या जोरावर ते प्रकरण दडपूनच टाकणं भूषणावह?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मागून वार, सैफची चोराशी झटापट!

## मानेवर 10 सेंटीमीटरची जखम, धारदार शस्त्र पाठीत रुतलं

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई: बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर एका अज्ञात व्यक्तीने चाकू हल्ला केला आहे. घरात शिरुन या अज्ञात व्यक्तीकडून सैफ अली खानवर हल्ला करण्यात आला. सध्या सैफवर लिलावती रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्याच्यावर एक शस्त्रक्रियाही करण्यात आली आहे.**

**या हल्ल्यात सैफच्या मानेला १० सेंटीमीटरती जखम झाली आहे. तर त्याच्या पाठीवर आणि हातावरही मोठा वार करण्यात आला आहे. सैफ अली खानच्या पाठीवर धारदार शस्त्र खुपसल्याचं समोर आलं आहे. ते शस्त्र शस्त्रक्रिया करुन बाहेर काढण्यात आल्याचीही माहिती आहे. लीलावती रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.**

सकाळी सैफ अली खानने मुंबई पोलिसांना एक स्टेटमेंट दिलं आहे. त्यामध्ये सैफने सांगितलं की, मी घरी बसलो होतो, तेव्हा माझ्यावर कोणीतरी मागून हल्ला केला. त्या हल्ल्यात दुखापत झाली. मी त्याच्याशी लढण्याचा प्रयत्न केला. यावेळी घरी मुलं आणि करिनाही होती. त्यांना वाचवण्यासाठी त्या व्यक्तीला प्रतिकार करावा लागला. ओव्हरपावर करण्याचा प्रयत्न केला पण मला दुखापत झाली होती, त्यात मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. त्यामुळे मी त्याला पकडू शकलो नाही. सैफ अली खानच्या टीमकडून निवेदन जारी करण्यात आलं आहे. एक चोर रात्री घरी आला, त्याच्या हल्ल्यात सैफ अली खान जखमी झाला.

### पोलिसांचा तपास सुरु

वांद्रे पोलिसांकडून अधिकचा तपास सुरु आहे. या घटनेनंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी कुटुंबीयांचीही चौकशी केली जात आहे. त्यावेळी नेमकं काय घडलं याची माहिती सध्या पोलीस घेत आहेत. ही अज्ञात व्यक्ती चोरीच्या उद्देशाने शिरली होती, हल्ला करण्याच्या उद्देशाने घरात आली होती की काही पूर्व वैमनस्यातून ही घटना घडली याचाही तपास पोलीस करत आहे. यापूर्वी या व्यक्तिने घराची रेकी केली होती याचाही तपास केला जात आहे. तसेच, पोलिसांनी याप्रकरणी ही घटना घडली तेव्हा घरात असेलेल्या तीन कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतली आहे.

### सहा वार, मणक्याला दुखापत; होणार प्लास्टिक सर्जरी

मुंबई: सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणानंतर बॉलिवूड पुन्हा हादरलं आहे. अभिनेता सैफ अली खानच्या घरात घुसून त्याच्यावर चाकू हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात सैफ अली खान गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर मुंबईतल्या लिलावती रुग्णालयात उपचार सुरू आहेत.चाकू हल्ल्यात अज्ञात व्यक्तींनं जोरदार वार केल्यानंतर सैफ जबर जखमी झाला आहेत. त्याच्यावर वेगवेगळ्या डॉक्टरांची टीम उपचार करत आहे. लिलावती रुग्णालयाकडून सैफच्या प्रकृतीबद्दल माहिती देण्यात आली आहे. लिलावती रुग्णालयचे सीइओ डॉ. नीरज उत्तामनी यांनी सांगितलं की, सैफ अली खान यांच्यावर रात्री ३.३०च्या दरम्यान त्यांच्याच बांद्रे इथल्या घरात एका अज्ञात व्यक्तीनं हल्ला केला. या व्यक्तीनं सैफवर सहा वार केला. यातले दोन वार हे अतिशय खोल असे आहेत. एक वार मणक्याच्या जवळ करण्यात आलाय. त्याच्यावर डॉक्टरांची टीम शस्त्रक्रिया करत आहेत. न्यूरोसर्जन असलेले डॉ. नितीन डांगे, कोस्मेटीक सर्जन, डॉ. लीना जैन, भूलतज्ञ निशा गांधी ही टीम त्यांच्यावर उपचार करत आहे.



### कर्मचारी ताब्यात

सगळ्यात आधी पोलिसांनी सैफ अली खानच्या घरी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतलं आहे. तसंच त्यांचे मोबाइल फोनही पोलिसांनी जप्त केले आहेत. यातील कोण अज्ञात व्यक्तीच्या संपर्कात तर नव्हता ना, असा तपास सध्या पोलिस करत आहेत.

### सुरक्षा वाढवली

पोलिसांनी सध्या सैफ अली खानच्या बिल्डिंगच्या जवळ पोलिस सुरक्षा वाढवली आहे.

### सुप्रिया सुळेंचा करिश्मा कपूरला फोन...

पुणे : बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर राहत्या घरात चाकू हल्ला झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. वांद्रे पश्चिम भागातील सैफच्या घरात एक अनोळखी व्यक्ती घुसली. सुरुवातीला तो लहान मुलांच्या खोलीत शिरला. सैफने हटकताच त्यांच्यामध्ये सुरुवातीला जोरदार वादावादी झाली. त्यानंतर झटापटीत चोराने सैफवर अनेक वार केले. हल्ल्यात सैफ गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारांसाठी लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्ल्याची घटना ऐकून राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सैफची मेहुणी आणि अभिनेत्री करिश्मा कपूरला फोन केला. खासदार सुप्रिया सुळे बारामती मतदारसंघात असताना पत्रकारांनी त्यांना ही घटना सांगितली. त्यामुळे सुप्रिया सुळेही हादरल्या. “शॉकिंग आहे” असं म्हणत त्यांनी तातडीने काही जणांना फोनाफोनी केली. अखेर करिश्मा कपूरचा फोन लागला.

माझ्याकडून तुला कुठली मदत हवी आहे का? पोलिस आलेत का? ॲम सो सॉरी टू हिअर मी माझ्या मतदारसंघातच आहे गं... पत्रकार माझ्याकडे आले आणि म्हणाले सैफसोबत असं असं झालं... मी लगेच सैफला केला... अर्थात काही रिप्लाय नाही आला.. मग मी तुला लावला... परत हिमा आंटी.. नीतू... नीतूला माहिती नसेल काही कदाचित... मग परत तुला फोन केला... तर तू उचललास... नाही नाही त्या मुलींच्या गँगला सांगूच नकोस काही.. ओव्हर रिॲक्टिंग टू द सिच्युएशन. पोलीस आलेत ना तिथे.. त्यांनी पकडलं का त्याला? अगं पण तो घरात घुसलाच कसा लोलो? केवढं भीतीदायक आहे हे... बेबो आणि सैफला सांग मी विचारलं म्हणून...बिग हग.. प्लीज टेक केअर.. गेट सम स्लीप... लॉट्स ऑफ लव्ह

रात्री ३.३० च्या सुमारास सैफ अली खानच्या घरात एक अज्ञात व्यक्ती शिरला. सगळ्यात आधी हा चोर सैफच्या मुलांच्या रुममध्ये घुसण्याचा प्रयत्न करत होता, पण त्या मुलांचा सांभाळ करणाऱ्या नॅनीच्या हे लक्षात आल्यानंतर तिनं आरडाओरडा सुरू केला. आवाज ऐकल्यानंतर सैफ अली खाननं या चोराला पकडण्याचा प्रयक्न केला.

# माझ्या नवऱ्यावर अन्याय झाला, न्याय कोण देणार?

## पोलीस कोठडी सुनावल्यानंतर वाल्मिक कराडच्या पत्नीची पहिली प्रतिक्रिया

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर समोर आलेल्या खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यानंतर आज वाल्मिक कराडला बीडच्या न्यायालयाने ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान वाल्मिक कराडच्या पत्नी मंजिली कराड यांनी, माझ्या नवऱ्यावर अन्याय झाला आहे, मला कोण न्याय देणार? असा प्रश्न केला आहे.**



“आज संतोष देशमुख यांचे कुटुंबीय न्याय मागायला मनोज जरांगे यांच्याकडे जात आहेत. माझ्या नवऱ्यावर सुद्धा अन्याय झाला आहे. मी माझ्या नवऱ्यासाठी न्याय मागतेय, मला न्याय कोण देणार आहे. मीडिया ट्रायल करून माझ्या नवऱ्याची एक एक गोष्ट बाहेर काढत आहेत. ज्यांनी ज्यांनी हे केले, त्यांचीही प्रकरणे मी बाहेर काढणार आहे. यामध्ये सुरेश धस, संदीप क्षीरसागर, बजरंग सोनावणे आणि अंजली दमानिया यांच्याही काही गोष्टी मी बाहेर काढणार आहे.”वाल्मिक कराडला पोलीस कोठडी सुनावल्यानंतर आजही परळीत आंदोलन सुरू असून, कराड समर्थकांनी परळी बंदची हाक दिली. बीड शहरात वाल्मिक कराड समर्थकांनी ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. यावेळी त्याच्या पत्नीने माध्यमांशी बोलताना, कराडवरील आरोप फेटाळून लावले आहेत.मंजिली कराड यांनी प्रतिक्रिया दिली होती. मंजिली कराड म्हणाल्या, “आज कराडवर जे राजकीय नेते आरोप करत आहेत. तेच एकेकाळी कराडकडून मदत घेत होते. आज त्यांच्या राजकीय फायद्यासाठी त्यांनी माझ्या पतीचा बळी देऊ नये. आज आरोप करणाऱ्यांनी कराडचा वापर करून घेतला. निवडून येण्यासाठी त्यांना माझ्या पतीचे सहकार्य पाहिजे होते. पण आज निवडून आल्यानंतर सत्तेत पद मिळविण्यासाठी माझ्या पतीचा बळी दिला जात आहे.

### कराड समर्थकांनी परळी बंदची हाक

वाल्मिक कराडच्या पत्नीने आमदार सुरेश धस, मनोज जरांगे आणि अंजली दमानिया यांच्यावरही आरोप केले होते.आज संतोष देशमुख यांचे कुटुंबीय न्याय मागायला मनोज जरांगे यांच्याकडे जात आहेत. माझ्या नवऱ्यावर सुद्धा अन्याय झाला आहे. मी माझ्या नवऱ्यासाठी न्याय मागतेय, मला न्याय कोण देणार आहे. मीडिया ट्रायल करून माझ्या नवऱ्याची एक एक गोष्ट बाहेर काढत आहेत. ज्यांनी ज्यांनी हे केले, त्यांचीही प्रकरणे मी बाहेर काढणार आहे. यामध्ये सुरेश धस, संदीप क्षीरसागर, बजरंग सोनावणे आणि अंजली दमानिया यांच्याही काही गोष्टी मी बाहेर काढणार आहे.”वाल्मिक कराडला पोलीस कोठडी सुनावल्यानंतर आजही परळीत आंदोलन सुरू असून, कराड समर्थकांनी परळी बंदची हाक दिली.

# इथियोपियाने घेतला मोठा निर्णय!

## सुरक्षेच्या कारणास्तव 164 नागरिकांना बोलावले परत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**पूर्व आफ्रिकेतील देश इथियोपियाने आपल्या 164 नागरिकांना लेबनॉनची राजधानी बेरुतमधून परत बोलवले आहे. हा निर्णय युद्धाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला आहे. इथियोपियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने यासंबंधित माहिती दिली.अदीस अबाबा: पूर्व आफ्रिकेतील देश इथियोपियाने सुरक्षेच्या कारणास्तव आपल्या 164 नागरिकांना लेबनॉनची राजधानी बेरुतमधून परत बोलवले आहे. इथियोपियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने ही माहिती दिली. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, या नागरिकांचा अदीस अबाबा येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्वागत करण्यात आले. परत आलेल्या नागरिकांचे स्वागत इथियोपियाच्या शरणार्थी आणि पुनर्वसन सेवांचे महासंचालक तेइबा हसन आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी केले.**

पराराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, इथियोपिया सरकार विविध देशांमध्ये सुरक्षेच्या समस्यांना सामोरे जाणाऱ्या आपल्या नागरिकांना स्वदेशात आणण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यांनी यावर भर दिला आहे की, सरकार शरणार्थी आणि पुनर्वसन सेवांच्या माध्यमातून परदेशात कठीण परिस्थितीत राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. यापूर्वी ऑक्टोबर 2024 मध्येही उथियोपियाने लेबनॉनमधून आपल्या नागरिकांना परत आणले होते. तसेच, परराष्ट्र मंत्रालयाने नमूद केले की हा निर्णय परदेशातील आपल्या नागरिकांच्या कल्याणासाठी सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेच्या (IOM) अहवालानुसार, इथियोपियन लोक लेबनानमधील मोठ्या स्थलांतरित समूहांपैकी एक आहेत.दरम्यान, इथियोपिया आणि सोमालिया यांच्यातील द्विपक्षीय संबंध सुधारण्याचा निर्णयही नुकताच घेण्यात आला आहे. इथियोपियाचे पंतप्रधान अबी अहमद आणि सोमालियाचे राष्ट्रपती हसन शेख मोहम्मद यांच्यात अदीस अबाबा येथे बैठक झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत दोन्ही देशांनी आपापसातील सहकार्य वाढवून क्षेत्रीय स्थिरतेसाठी मजबूत सहकार्याची गरज व्यक्त केली. दोन्ही नेत्यांनी परस्पर विश्वास, आदर आणि सामंजस्य यांवर आधारित संबंध सुधारण्यावर भर दिला. इथियोपियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, क्षेत्रीय स्थिरतेसाठी समन्वय बळकट करण्याची आणि सामाईक प्रगतीसाठी काम करण्याची ग्वाही दोन्ही देशांनी दिली. या निर्णयामुळे दोन्ही देशांतील संबंध अधिक सुदृढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकीकडे परदेशातील नागरिकांना सुरक्षितपणे परत आणण्याचे सरकारचे प्रयत्न तर दुसरीकडे क्षेत्रीय संबंध सुधारण्यासाठीचे प्रयत्न, या दोन्ही बाबी इथियोपियाच्या प्रगतीशील धोरणांचे दर्शन घडवतात. अशा निर्णयांमुळे देशातील सामाजिक आणि राजकीय स्थिरतेला हातभार लागेल.पराराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, इथियोपिया सरकार विविध देशांमध्ये सुरक्षेच्या समस्यांना सामोरे जाणाऱ्या आपल्या नागरिकांना स्वदेशात आणण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यांनी यावर भर दिला आहे की, सरकार शरणार्थी आणि पुनर्वसन सेवांच्या माध्यमातून परदेशात कठीण परिस्थितीत राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

### मजबूत सहकार्याची गरज व्यक्त

ऑक्टोबर 2024 मध्येही उथियोपियाने लेबनॉनमधून आपल्या नागरिकांना परत आणले होते.तसेच, परराष्ट्र मंत्रालयाने नमूद केले की हा निर्णय परदेशातील आपल्या नागरिकांच्या कल्याणासाठी सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेच्या (IOM) अहवालानुसार, इथियोपियन लोक लेबनानमधील मोठ्या स्थलांतरित समूहांपैकी एक आहेत.दरम्यान, इथियोपिया आणि सोमालिया यांच्यातील द्विपक्षीय संबंध सुधारण्याचा निर्णयही नुकताच घेण्यात आला आहे. इथियोपियाचे पंतप्रधान अबी अहमद आणि सोमालियाचे राष्ट्रपती हसन शेख मोहम्मद यांच्यात अदीस अबाबा येथे बैठक झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत दोन्ही देशांनी आपापसातील सहकार्य वाढवून क्षेत्रीय स्थिरतेसाठी मजबूत सहकार्याची गरज व्यक्त केली.दोन्ही नेत्यांनी परस्पर विश्वास, आदर आणि सामंजस्य यांवर आधारित संबंध सुधारण्यावर भर दिला. इथियोपियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, क्षेत्रीय स्थिरतेसाठी समन्वय बळकट करण्याची आणि सामाईक प्रगतीसाठी काम करण्याची ग्वाही दोन्ही देशांनी दिली.

---

# दक्षिण कोरियाच्या राजकारणात ऐतिहासिक वळण

## कोरियाचे राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांच्यावर भ्रष्टाचारचा आरोप

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांना त्यांच्या महाभियोगानंतर बुधवारी (15 जानेवारी) कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी अटक केली. या घटनेने देशाच्या राजकीय वर्तुळात खळबळ माजवली आहे, कारण दक्षिण कोरियाच्या इतिहासात हे पहिलेच प्रकरण आहे जिथे विद्यमान राष्ट्रपतींना अटक करण्यात आली आहे. या अभूतपूर्व अटकेमुळे देशाच्या राजकारणावर खोल परिणाम होण्याची शक्यता आहे.**

यून सुक येओल यांच्यावर भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर आणि इतर अनियमितता यासंबंधी विविध आरोप होते. दक्षिण कोरियाच्या संसदेत महाभियोग प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर कायदा अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांना अटक करण्याचा निर्णय घेतला. या घटनामुळे देशातील राजकीय अस्थिरतेचे वातावरण आणखी गंभीर झाले आहे. महाभियोग प्रक्रिया सुरु असतानाच त्यांची अटक ही एक नाटकीय घटना बनली. 1,000 हून अधिक अँटी करप्शन अन्वेषक आणि पोलिस अधिकारी यून सुक येओल यांच्या निवासस्थानावर पोहोचले. त्यांच्या घराभोवती बॅरिकेड्स लावण्यात





आले होते, पण पोलिसांनी त्यांना अटक केली. यून सुक येओल यांच्यावर महाभियोग चालवताना आरोप करण्यात आले की त्यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून मार्शल लॉ लादण्याचा प्रयत्न केला होता. हे आरोप देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र टीकेला तोंड देत होते. राष्ट्रपतीच्या अटकेमुळे या आरोपांच्या कडे आणखी लक्ष दिले जात आहे, आणि या घटनेमुळे दक्षिण कोरियाच्या राजकारणात गंभीर अस्थिरतेचे संकेत मिळत आहेत. यून सुक येओल यांची अटक आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधून घेत आहे. काही देशांनी याला दक्षिण कोरियाच्या लोकशाहीचा विजय म्हणून पाहिले आहे, तर काहींनी त्याची प्रतिक्रिया देशाच्या राजकीय स्थिरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी मानली आहे. परंतु या घटनेने याच्याशी संबंधित असलेल्या अनेक नेत्यांसाठी आणि संस्थांसाठी संकट निर्माण केले आहे.

### कोरियाच्या न्यायव्यवस्थेची ताकद

दक्षिण कोरियाच्या इतिहासात विद्यमान राष्ट्रपतींना अटक होण्याची ही पहिलीच वेळ आहे, आणि ही घटना देशाच्या न्यायव्यवस्थेच्या मजबुतीचे प्रतीक ठरते. कायद्यापुढे सर्व समान आहेत, असं स्पष्ट होणं, याचे महत्वपूर्ण संदेश आहे. या अटकेने देशातील न्यायव्यवस्थेची अपार ताकद दाखवली आहे, आणि हे दर्शवते की कोणत्याही व्यक्तीला, जरी या अटकेला आंतरराष्ट्रीय स्तरावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला असला तरी, यामुळे दक्षिण कोरियाच्या राजकीय स्थिरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# "सहा कोटींची कार घेतली अन् आता सायकल का चालवतोस?

बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन सध्या त्याचा आगामी चित्रपट 'भूल भूलैया ३' च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. आता अलीकडेच अभिनेत्याने त्याच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. कार्तिकने एक नवीन आलिशान अशी रेंज रोव्हर एसयुव्ही खरेदी केली आहे, ज्याची किंमत ६ कोटी रुपये आहे. परंतु कार खरेदी केल्यानंतर, अभिनेता आता सायकल चालवताना दिसला आहे, यावर चाहत्यांनी अभिनेत्याला काही धमाल प्रश्नदेखील विचारले आहेत. कार्तिकने नुकतंच एक रील शेअर केलं आहे, ज्यामध्ये तो सायकल चालवताना दिसत आहे. त्यानंतर त्याने या रीलवर आलेल्या चाहत्यांच्या काही कमेंट्सना उत्तरही दिले. जेव्हा चाहत्यांनी अभिनेत्याला ६ कोटी रुपयांची नवीन कार खरेदी केल्यानंतरही सायकल का चालवत आहे असे विचारले. तेव्हा कार्तिकने त्याला भन्नाट उत्तर दिले आहे.कार्तिकने हे रील त्याच्या अधिकृत





इंस्टाग्राम हँडलवर शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिले की, "आता मी सायकलवरून सेटवर जाण्याचा विचार करत आहे." अभिनेत्याच्या या रीलवर टिप्पणी करताना एका यूजरने म्हटले की, "मला तुझी ६ कोटी रुपयांची कार दे." या कमेंटवर कार्तिकने मजेशीर उत्तर दिले आणि म्हणाला, "मी दुसऱ्या एका मित्राला वापरायला दिली आहे... ती परत आल्यावर सांगेन.

## ते मला हातोड्याने मारायचे

रवी किशन किरण रावच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'लापता लेडीज' या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसले. या चित्रपटाच्या निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी वडिलांबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं. रामलीलामध्ये अभिनय करण्यास सुरुवात केल्यावर वडील खूप रागावले होते. पण नंतर मात्र आपण सिनेसृष्टीत करिअर केल्यावर त्यांना माझा खूप अभिमान वाटत होता, असं रवी किशन यांनी सांगितलं. 'ब्रुट'ला दिलेल्या एका मुलाखतीत रवी किशन यांनी खुलासा केला की वडिलांच्या रागामुळे त्यांना १७ व्या वर्षी घरातून पळून जावं लागलं होतं. "माझे वडील मला खूप मारत होते, ते मला हातोड्याने मारायचे. त्यांना माझा खून करायचा होता आणि माझ्या आईला माहित होतं की बाबा मला मारू शकतात. ते माझा जीव घेण्यास मागेपुढे पाहणार नाही. त्यामुळे आई मला म्हणाली की 'पळून जा'. खिशात ५०० रुपये घेऊन मी घर सोडलं आणि मुंबईला जाणारी ट्रेन पकडली होती," असं रवी किशन म्हणाले.रवी किशन यांनी वडिलांच्या अशा वागणुकीचं समर्थनही केलं. "ते पुजारी होते आणि ब्राह्मण असल्याने मी शेती करावी किंवा पुजारी व्हावं किंवा सरकारी नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. आपल्या कुटुंबात एखादा कलाकार जन्माला येऊ शकतो,.

## सारा खानने केला रॅम्प वॉक



'मर्डर मुबारक' या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. 'शेरनी', 'क्यूट लूक' अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'मर्डर मुबारक'नंतर २१ मार्चला ओटीटीवर तिचा 'ऐ वतन मेरे वतन' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात साराने उषा मेहता यांची भूमिका निभावली आहे. धर्मा प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या या चित्रपटात सारासह अभिनेता इमरान हाश्मी पाहायला मिळणार आहे.'मर्डर मुबारक' या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. 'शेरनी', 'क्यूट लूक' अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'मर्डर मुबारक'नंतर २१ मार्चला चित्रपटात साराने

## देवाशिष माखिजा यांनी व्यक्त केली खंत

मनोज बाजपेयींच्या 'जोरम' या चित्रपटाचे दिग्दर्शक देवाशिष माखिजा यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. यामध्ये त्यांनी चित्रपट, राजकारण, कला, त्यांचा प्रवास आणि संघर्ष याविषयी सांगितले. एक चांगला चित्रपट बनवण्यासाठी किती मोठा संघर्ष करावा लागतो हे त्याने या मुलाखतीमध्ये सांगितले. 'आज्जी' आणि 'जोरम'सारखे अप्रतिम चित्रपट बनवल्यानंतरही पुढचा चित्रपट बनवणे कठीण असल्याचं त्याने स्पष्ट केलं. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जोरम'ला अप्रतिम रेटिंग मिळाले तसेच समीक्षकांनीही चित्रपटाला उचलून धरले पण त्यानंतरही देवाशिष यांचा संघर्ष सुरूच आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये देवाशिष म्हणाले, "२० वर्षे या इंडस्ट्रीमध्ये काम करूनसुद्धा माझ्या एकाही चित्रपटातून आर्थिक फायदा मला झालेला नाही. माझी चाळीशी उलटून चालली आहे अन् म्हणालेकमावले नाहीत. मला माझ्या घराचे भाडे भरणेदेखील जमत नाहीये. गेले पाच महीने मी भाडे दिलेले नाही. सध्या मी माझ्या घरमालकाकडे विनंती करतो आहे की त्याने मला घराबाहेर काढू नये. जेव्हा तुम्ही तुमच्या कलागुणांना अधिक प्राधान्य देता तेव्हा त्याची एक मोठी किंमत तुम्हाला चुकवावी लागते." हा एक संघर्ष आणि यासाठी ते तयार आहेत असंही देवाशिष या मुलाखतीदरम्यान म्हणाले.




## क्रिती आणि पुलकित यांनी बांधली लग्नगाठ

अभिनेत्री क्रिती खरबंदा आणि अभिनेता पुलकित सम्राटयांनी लग्नगाठ बांधली आहे. दोघांचा लग्नसोहळा धुमधडाक्यात पार पडला आहे. क्रिती आणि पुलकित या नवविवाहित जोडप्याने नुकतेच त्यांच्या लग्नसोहळ्याचे खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यांच्या या फोटोंवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.क्रिती आणि पुलकित यांनी शेअर केलेल्या लग्नसोहळ्याच्या फोटोमध्ये दोघेही खास लूकमध्ये दिसत आहेत. लग्नसोहळ्यासाठी क्रितीनं पिंक कलरचा लेहंगा आणि स्टोनची ज्वेलरी असा लूक केला होता. तर पुलकितनं लग्नसोहळ्यात सी ग्रीन कलरची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीच्या डिझाइननं अनेकांचे लक्ष वेधले होते.2014 मध्ये पुलकितनं श्वेता रोहिरासोबत लग्न केले होते. श्वेता ही सलमान खानची 'राखी सिस्टर' आहे. पण पुलकित आणि श्वेता यांचा संसार फार काळ टिकला नाही. पुलकित आणि श्वेता यांनी 2015 मध्ये घटस्फोट घेतला.वीरे की वेडिंग आणि तैश या चित्रपटांमध्ये क्रिती आणि पुलकित यांनी काम केलं आहे. पण पागलपंती या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान क्रिती आणि पुलकित हे एकमेकांच्या प्रेमात पडले. फुकरे, फुकरे रिटर्न्स, जय हो या चित्रपटात पुलकितनं काम केलं.

# प्रतिका रावलचा वर्ल्ड रेकॉर्ड!

## कोणत्याच महिला फलंदाजाला जमली नाही अशी कामगिरी

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताची नवी सलामीवीर प्रतिका रावलने हिने एकदिवसीय क्रिकेटमध्ये पाऊल ठेवताच आपल्या खेळीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. भारत वि आयर्लंड मालिकेत तिने एकापेक्षा एक उत्कृष्ट खेळी केल्या पण तिला शतकापर्यंत पोहोचता आले नाही. पण प्रतिकाने अखेरच्या वनडे सामन्यात ही कसर पूर्ण केली. एकदिवसीय क्रिकेटमधलं पहिलं शतक झळकावताना तिने १५४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या सामन्यातील या उत्कृष्ट खेळीशिवाय प्रतिका रावलने असा पराक्रम केला आहे, जो याआधी जगातील इतर कोणत्याही फलंदाजाला करता आला नाही. तिने ६ वनडे डावांमध्ये विक्रमी धावा केल्या आहेत.**



भारत वि आयर्लंड यांच्यात खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत भारताने ३-० ने असा निर्भेळ विजय मिळवला आहे. सलामीवीर प्रतिका रावलने राजकोटमध्ये झालेल्या तिसऱ्या सामन्यात १५४ धावा केल्या. यासह भारतीय महिला क्रिकेट संघाने वनडेत प्रथमच ४०० धावांचा टप्पा पार केला. याआधी याच सामन्यात कर्णधार स्मृती मानधनानेही शतक झळकावले होते. एकीकडे स्मृती मानधनाचे हे दहावे शतक होते, तर दुसरीकडे प्रतिकाने वनडेतील पहिले शतक झळकावले.प्रतिका रावलला आयर्लंड मालिकेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी मालिकावीर म्हणून निवडण्यात आले. प्रतिका आता भारतासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक खेळी खेळणारी तिसरी फलंदाज ठरली आहे. दीप्ती शर्माने भारतीय महिला संघासाठी सर्वात मोठी एकदिवसीय खेळी खेळली आहे. तिने २०१७ मध्ये आयर्लंडविरुद्ध १८८ धावा केल्या होत्या. त्यानंतर २०१७ मध्येच हरमनप्रीत कौरने नाबाद ११ धावांची शानदार खेळी केली होती. आता प्रतिका रावलने १५४ धावा करत तिसरे स्थान मिळवले आहे.प्रतिका रावलने अवघ्या सहा वनडे सामन्यांमध्ये विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. तिने पहिल्या ६ एकदिवसीय डावात एकूण ४४४ धावा केल्या आहेत. पहिल्या सहा वनडे सामन्यांनंतर कोणत्याही महिला फलंदाजाने केलेल्या या सर्वाधिक धावा आहेत. तिने थायलंडच्या नत्थाकन चँथमला मागे टाकले आहे, ज्याने तिच्या पहिल्या सहा एकदिवसीय सामन्यांमध्ये ३२२ धावा केल्या होत्या. प्रतिकाने वेस्ट इंडिजविरूद्धच्या वनडे मालिकेत भारताकडून पदार्पण केले होते.

भारत वि आयर्लंड यांच्यात खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत भारताने ३-० ने असा निर्भेळ विजय मिळवला आहे. सलामीवीर प्रतिका रावलने राजकोटमध्ये झालेल्या तिसऱ्या सामन्यात १५४ धावा केल्या. यासह भारतीय महिला क्रिकेट संघाने वनडेत प्रथमच ४०० धावांचा टप्पा पार केला. याआधी याच सामन्यात कर्णधार स्मृती मानधनानेही शतक झळकावले होते. एकीकडे स्मृती मानधनाचे हे दहावे शतक होते, तर दुसरीकडे प्रतिकाने वनडेतील पहिले शतक झळकावले.प्रतिका रावलला आयर्लंड मालिकेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी मालिकावीर म्हणून निवडण्यात आले. प्रतिका आता भारतासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक खेळी खेळणारी तिसरी फलंदाज ठरली आहे. दीप्ती शर्माने भारतीय महिला संघासाठी सर्वात मोठी एकदिवसीय खेळी खेळली आहे. तिने २०१७ मध्ये आयर्लंडविरुद्ध १८८ धावा केल्या होत्या.

### नत्थाकन चँथमला मागे टाकले

हरमनप्रीत कौरने नाबाद ११ धावांची शानदार खेळी केली होती. आता प्रतिका रावलने १५४ धावा करत तिसरे स्थान मिळवले आहे.प्रतिका रावलने अवघ्या सहा वनडे सामन्यांमध्ये विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. तिने पहिल्या ६ एकदिवसीय डावात एकूण ४४४ धावा केल्या आहेत. पहिल्या सहा वनडे सामन्यांनंतर कोणत्याही महिला फलंदाजाने केलेल्या या सर्वाधिक धावा आहेत. तिने थायलंडच्या नत्थाकन चँथमला मागे टाकले आहे, ज्याने तिच्या पहिल्या सहा एकदिवसीय सामन्यांमध्ये ३२२ धावा केल्या होत्या. प्रतिकाने वेस्ट इंडिजविरूद्धच्या वनडे मालिकेत भारताकडून पदार्पण केले होते.भारताची नवी सलामीवीर प्रतिका रावलने हिने एकदिवसीय क्रिकेटमध्ये पाऊल ठेवताच आपल्या खेळीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. भारत वि आयर्लंड मालिकेत तिने एकापेक्षा एक उत्कृष्ट खेळी केल्या पण तिला शतकापर्यंत पोहोचता आले नाही. पण प्रतिकाने अखेरच्या वनडे सामन्यात ही कसर पूर्ण केली.

# स्मृती-प्रतिकाची द्विशतकी भागीदारी

## 233 धावांची भागीदारी रचत 20 वर्षांपूर्वीचा मोठा विक्रम मोडला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि आयर्लंड महिला संघात एकदिवसीय मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना राजकोट येथे खेळला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. स्मृती मंधानाने नुकतीच पदार्पण केलेल्या प्रतिका रावलसह डावाची सुरुवात केली. या दोन्ही फलंदाजांनी दमदार फटकेबाजी करताना शतकं झळकावली. त्याचबरोबर स्मृती आणि प्रतिकाने पहिल्या विकेट्साठी विक्रमी भागीदारी इतिहास घडवला.**



दोघांनी पहिल्या विकेट्ससाठी २३३ धावांची भागीदारी रचत २० वर्षांपूर्वीचा मोठा विक्रम मोडला.दोन्ही फलंदाजांनी एकदिवसीय डावाची सुरुवात टी-२० शैलीत केली आणि आक्रमक फलंदाजी करत पहिल्या १० षटकात ९० धावा केल्या. १३ षटके पूर्ण झाल्यावर दोन्ही फलंदाजांमध्ये पहिल्या विकेटसाठी १०० धावांची भागीदारी झाली. अशाप्रकारे मानधना आणि रावल या सलामीच्या जोडीने सलग दुसऱ्या वनडे सामन्यात शतकी भागीदारी करण्याचा मोठा पराक्रम केला. एवढेच नाही तर या सलामीच्या जोडीमध्ये चौथ्यांदा शतकी भागीदारी पाहायला मिळाली.या भारतीय सलामी जोडीने २० षटकात १५७ धावा केल्या होत्या. या काळात दोघींनीही आपापली अर्धशतके पूर्ण केली. अशाप्रकारे, ही जोडी सलग दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये १५० हून अधिक धावांची भागीदारी करणारी जगातील चौथी आणि भारताची पहिली जोडी ठरली.स्मृती मानधनाने आयरिश गोलंदाजांची धुलाई करताना ७० चेंडूत शतक झळकावले आणि अशा प्रकारे भारतासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक झळकावणारी महिला खेळाडू ठरली. शतक झळकावल्यानंतरही मंधानाने रावलसह धावांचा वेग कायम राखला आणि लवकरच भारताची धावसंख्या २०० पार केली.

### 20 वर्ष जुना विक्रम मोडला

यानंतर भारतीय संघाला स्मृती मानधनाच्या (१३५) रुपाने पहिला धक्का बसला. आपल्या या खेळीत तिने ८० चेंडूंचा सामना करताना १२ चौकार आणि ७ षटकारांचा पाऊस पाडला. यासोबतच मानधना आणि प्रतिका यांच्यातील भागीदारीही तुटली. या दोघींनी पहिल्या विकेटसाठी २३३ धावांची भागीदारी केली जी भारतीय महिला क्रिकेटच्या इतिहासातील एकदिवसीय क्रिकेटमधील कोणत्याही विकेट्ससाठी तिसरी सर्वोच्च भागीदारी आहे. यासह स्मृती-प्रतिका जोडीने २० वर्षे जुना विक्रम मोडला.